**दिनांक : २६ जून, २०१५**

**प्रसिध्दी पत्रक**

**आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता वीज वितरणाचा दर (१ जून, २०१५ पासून)**

**१) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. – वितरण (आरइन्फ्रा-डी)**

**आणि**

**दि टाटा पॉवर कंपनी लि. – वितरण (टीपीसी – डी)**

**अ) आरइन्फ्रा -डी आणि टीपीसी -डी करिता वीज वितरणाचा दर**

आरइन्फ्रा-डी ची आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता मध्यावधी आढावा आणि सुधारित वीज दर निश्चित करण्यासाठी (सन २०१५ चे प्रकरण क्र. ४) याचिका १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी आणि टीपीसी–डी ची आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता मध्यावधी आढावा आणि सुधारित वीज दर निश्चित करण्यासाठी (सन २०१५ चे प्रकरण क्र. १८) याचिका दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी आयोगाने दाखल करुन घेतली. आयोगाने ग्राहक आणि अन्य हितसंबंधितांकडून सूचना/हरकती मागविल्या आणि आरइन्फ्रा-डी करिता जाहीर सुनावणी १६ मार्च, २०१५ रोजी आणि टीपीसी-डी करिता दि. २० मार्च, २०१५ रोजी सेंट्रम हॉल, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४०० ००५ येथे सुनावणी घेतली. या प्रक्रियेमध्ये ग्राहक प्रतिनिधींनी देखील भाग घेतला. आयोगाने हितसंबंधितांनी जाहीर सुनावणीमध्ये उपस्थित केलेले मुद्यांची योग्य दखल घेतली आणि ते शक्य तितके सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. **सुधारीत वीज दर दिनांक १ जून, २०१५ पासून अंमलात येतील.**

ब) मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये विजेचा पुरवठा करण्यासाठी टीपीसी-डी चा वितरण परवाना दि. १४ ऑगस्ट २०१४ रोजी संपुष्टात आला आणि संपूर्ण नियामक प्रक्रियेनंतर दि. १४ ऑगस्ट, २०१४ च्या आदेशाद्वारे टीपीसी-डी ला मुंबई शहराच्या संपूर्ण भौगोलिक क्षेत्रामध्ये आणि मीरा-भायंदरच्या काही भागांकरिता वितरण

परवाना २५ वर्षांच्या कालावधीकरिता मंजूर केला. परवान्याच्या अटींचा एक भाग म्हणून टीपीसी-डी वर त्यांच्या संपूर्ण परवाना क्षेत्राकरिता एक रोल आऊट प्लॅन आयोगाकडून मंजूर करुन घेण्याचे बंधन आहे. ही योजना सध्या आयोगाच्या विचाराधीन आहे. विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाने त्यांच्या दि. २८ नोव्हेंबर, २०१४ च्या आदेशाने आयोगाला एका परवानाधारकाकडून दुसऱ्या परवानाधारकाकडे जाणाऱ्या ग्राहकांकरिता कार्यपध्दती निश्चित करण्याचे निर्देश दिले असून ही बाब देखील सध्या आयोगाच्या विचाराधीन आहे. या रोल आऊट प्लॅन आणि सुधारित कार्यपध्दतीचा परिणाम पुढील वर्षी म्हणजे आर्थिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये दिसून येण्याची शक्यता आहे.

**क) आयोगाच्या या वीज दराच्या आदेशांमधील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-**

१) वीज ग्राहकांवर अनावश्यक वीज दराच्या वाढीचा बोजा पडणार नाही आणि त्याच वेळी परवानाधारकांची आर्थिक स्थिती तसेच ग्राहकांना सेवा पुरविण्याची त्यांची क्षमता यावर विपरित परिणाम होणार नाही, हे तत्व आयोगाने लक्षात घेतले आहे.

२) भारत सरकारने अधिसूचित केलेले वीज दर धोरण, वरिष्ठ न्यायालय आणि विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाने यापूर्वी दिलेले निकाल, मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ आणि विद्युत अधिनियम, २००३ नुसार, आयोगाने परवानाधारकांची एकूण महसुली गरज (एआरआर) आणि ग्राहकांकरिता वर्गवारी-निहाय वीज दर निश्चित केले आहेत.

३) आयोगाने, परवानाधारकांनी केलेले खर्च, मविनिआ बहु-वर्षीय वीज दर विनियमांमध्ये मान्यता देण्यात आलेल्या प्रमाणकानुसार खर्चांना अनुसरुन व योग्य ती तपासणी करुन मान्य केले आहेत. हे खर्च वितरण हानि, संचालन आणि देखभाल खर्च इ. सारख्या मापदंडांकरिता साध्य करावयाच्या कामगिरीच्या पातळीशी निगडीत आहेत.

४) मुंबई शहर हे भौगोलिकदृष्ट्या सात बेटांचा समुह आहे व येथे एकाच वीज पुरवठा क्षेत्रामध्ये आरइन्फ्रा-डी, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि वाहतूक उपक्रम (बेस्ट) आणि दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड -डी (टीपीसी-डी) असे बहुविध वितरण परवानाधारक कार्यरत आहेत. यामधील टीपीसी-डी चे परवाना क्षेत्र हे, आरइन्फ्रा-डी आणि बेस्टच्या परवानाक्षेत्रात परस्परव्याप्त (ओव्हरलॅप) आहे. आरइन्फ्रा-डी आणि बेस्ट अनुक्रमे मुंबई उपनगरे आणि मुंबई शहर क्षेत्रात वीज पुरवठा करतात. या तिन्ही वितरण परवानाधारकांचा वीज पुरवठ्याचा खर्च, ग्राहक वर्गवारीची संरचना, वीज वापराची संमिश्र रचना, वहन तोटा आणि वहन आकार, आंतर-वर्गवारी क्रॉस सबसिडी इ. बाबी वेगवेगळ्या आहेत आणि त्यामुळे एकाच ग्राहक वर्गवारीतील ग्राहकांना, त्या त्या क्षेत्रात असणाऱ्या परवानाधारकांनुसार, वेगवेगळे वीज दर लागू आहेत.

५) आयोगाने वितरण परवानाधारकांची एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित करताना, निर्मिती कंपन्या आणि पारेषण परवानाधारकांसाठीच्या आयोगाकडून मान्यता देण्यात आलेला वीज निर्मिती खर्च आणि पारेषण आकार विचारात घेतले.

६) आरइन्फ्रा-डी च्या बाबतीत, आरइन्फ्रा-डी ने स्वतः दिलेल्या निवेदनानुसार त्यांचे विदर्भ औद्योगिक प्रा. लिमिटेड (व्हीआयपीएल)मध्ये अप्रत्यक्ष मालकी नियंत्रण असल्यामुळे व्हीआयपीएलकडून विजेची खरेदी करावयाच्या खर्चाबाबत आयोगाला वेगळा दृष्टीकोन स्वीकारणे भाग पडले आहे. आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या आरइन्फ्रा-डी आणि व्हीआयपीएल यांच्यामधील वीज खरेदी करारात (पीपीए), आरइन्फ्रा-डी ने असे नमूद केले होते की, व्हीआयपीएल इंधन पुरवठा करारा (एफएसए) अंतर्गत कोळसा प्राप्त करुन घेणार होते. तथापि, प्रत्यक्षात व्हीआयपीएलने इंधन पुरवठा करार केलेला नाही आणि त्यांनी अन्य स्त्रोतांकडून महागड्या कोळशाची खरेदी केली आहे, ज्यामुळे वीज खरेदी खर्चात मोठी वाढ झाली आहे. ही वाढ आरइन्फ्रा-डी च्या बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशात मान्यता दिलेल्या खर्चाच्या तुलनेत जास्त असून ती आरइन्फ्रा-डी ने ग्राहकांकडून

वसूल करण्याचे प्रस्तावित केले होते. आरइन्फ्रा-डी ने वीज खरेदी करारापासून घेतलेल्या या फारकतीस आयोगाची पूर्व-मान्यता घेतलेली नसल्यामुळे, आयोगाने वीज खरेदीवरील ज्यादा खर्च विचारात घेतला नाही. तसेच आरइन्फ्रा-डी ने वीज खरेदीसाठी मान्यता दिलेल्या खर्चाच्या १०५ टक्क्यांहून जास्त झालेल्या खर्चास आयोगाची पूर्व-मान्यता घेणे आवश्यक होते, जी त्यांनी घेतलेली नाही. आयोगाचे असे मत आहे की वीज खरेदीवरील खर्चात झालेल्या या वाढीचा बोजा ग्राहकांवर टाकणे रास्त होणार नाही. त्यामुळे आयोगाने व्हीआयपीएलकडून वीज खरेदीसाठी झालेला खर्च हा व्हीआयपीएलकरिता आयोगाने वेगळ्या आदेशामध्ये मान्यता दिलेल्या वीज दराइतका मर्यादित ठेवला आहे.

७) आरइन्फ्रा-डीने आर्थिक वर्ष २०१२-२०१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज खरेदी खर्चापोटी मागितलेल्या रु. १५७३३ कोटीच्या तुलनेत आयोगाने रु. १४५७० कोटीच्या वीज खरेदी खर्चास मान्यता दिलेली आहे.

८) आरइन्फ्रा-डीने आर्थिक वर्ष २०१२-२०१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी पारेषण आकारापोटी मागितलेल्या रु. १६२६ कोटीच्या तुलनेत आयोगाने रु. १४४० कोटीच्या पारेषण आकारांना मान्यता दिलेली आहे. टीपीसी-डी च्या बाबतीत, वीज खरेदी खर्चाचा अंदाज कमी दाखविलेला आहे, त्यामुळे अल्प कालावधीकरिता जरी वीज दर कमी झाल्याचे दिसत असले तरी अचूक समायोजनाच्या वेळी मात्र हा खर्च नक्कीच वाढला असता. टीपीसी-डी कडे प्रत्यक्ष खर्च उपलब्ध असताना आयोगास अशा प्रकारचे अवास्तव गृहितक मान्य नाही. त्यामुळेच टीपीसी-डी ने आर्थिक वर्ष २०१२-२०१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज खरेदी खर्चासाठी रु. १२०१९ कोटीची मागणी केली असताना, आयोगाने १२२०८ कोटीच्या वीज खरेदी खर्चास मान्यता दिली आहे. टीपीसी-डी ने आर्थिक वर्ष २०१२-२०१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी रु. पारेषण आकारासाठी रु. १५९७ कोटीच्या केलेल्या मागणीच्या तुलनेत रु. १३५५ कोटीच्या पारेषण खर्चास मान्यता दिली आहे.

९) आयोगाने आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे प्राप्ती करास मान्यता दिली आहे.

ए) आरइन्फ्रा – डी ने मागितलेल्या रु. ३५३ कोटीच्या तुलनेत रु. ११८ कोटी

बी) टीपीसी-डी ने मागितलेल्या रु. १३५ कोटीच्या तुलनेत रु. ८१ कोटी

१०) आयोगाने आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे संचयी महसुली तुटीस मान्यता दिली आहे.

ए) आरइन्फ्रा – डी ने मागितलेल्या रु. १९४७ कोटीच्या तुलनेत रु. ३१३ कोटी

बी) टीपीसी-डी ने मागितलेल्या रु. १६७३ कोटीच्या तुलनेत रु. ७६० कोटी

११) आयोगाने आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चास मान्यता दिली आहे.

ए) आरइन्फ्रा-डी ने मागितलेल्या रु.१०.२८ प्रति युनिटच्या तुलनेत रु.८.२३ प्रति युनिट

बी) टीपीसी-डी ने मागितलेल्या रु. १०.११ प्रति युनिटच्या तुलनेत रु.७.७१ प्रति युनिट

१२) आयोगाने आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे वहन आकारांना मान्यता दिली आहे.

ए) आरइन्फ्रा-डी - उच्च दाब रु. ०.९४ प्रति युनिट, लघु दाब रु. १.८० प्रति युनिट

बी) टीपीसी-डी - उच्च दाब रु. ०.३० प्रति युनिट, लघु दाब रु. ०.७७ प्रति युनिट

१३) आयोगाने दि. १ एप्रिल २०१५ पासून अंमलात असलेल्या सुधारित वीज दरामध्ये आयोगाने सरासरी खालीलप्रमाणे एकूण वाढ मान्य केली आहे.

अ) आरइन्फ्रा-डी करिता ५.२ टक्के

ब) टीपीसी-डी करिता ३.९ टक्के

१४) आयोगाने लघु दाब आणि उच्च दाब वर्गवारी या दोन्ही वर्गवारीतील “सार्वजनिक सेवा” अंतर्गत “शासकीय शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये” नावाची एक नवीन उप-वर्गवारी निर्माण केली आहे. “शासकीय शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये” वर्गवारीसाठीचा वीज दर वीज पुरवठ्याचा सरासरी खर्चाच्या जवळचा ठेवण्यात आला आहे. आयोगाने पूर्वी रेल्वे या वर्गवारीत वर्गीकरण केलेली मेट्रो आणि मोनोरेल उप-वर्गवारी, आयोगाने आता वेगळी केली आहे.

१५) आयोगाने क्रॉस सबसिडी कमी केल्याची आणि ती शक्य तितकी सरासरी वीज पुरवठा खर्चाच्या ± २० टक्के मर्यादेच्या आत राहील, याची खात्री केली आहे. जेथे क्रॉस सबसिडी कमी करणे शक्य झाले नाही तेथे क्रॉस सबसिडी विद्यमान पातळीवर ठेवण्यात आली आहे.

१६) क्रॉस सबसिडी अधिभाराचा चेंजओव्हर आणि मुक्त प्रवेश ग्राहकांच्या देयकांवर मोठा परिणाम होत असल्याची बाब विचारात घेऊन आयोगाने क्रॉस सबसिडी अधिभाराची परिगणना करण्याच्या सूत्रात फेरबदल केला असून तो सविस्तर वीज दराच्या आदेशात परिच्छेद ७.७ मध्ये पाहता येईल.

१७) आरइन्फ्रा-डी च्या ग्राहकांना आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये लागू असलेल्या विद्यमान आणि सुधारित वीज दराची तुलना **परिशिष्ट - १** मध्ये देण्यात आली आहे. टीपीसी-डी च्या ग्राहकांना आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये लागू असलेल्या विद्यमान आणि सुधारीत वीज दराची तुलना **परिशिष्ट - २** मध्ये देण्यात आली आहे.

१८) आरइन्फ्रा-डी आणि टीपीसी-डी करिता आयोगाचा सविस्तर आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in/www.merc.gov.in या संकेत-स्थळावरुन उतरवून घेता येईल.

## Annexure 1: Category-wise Tariff for RInfra-D's consumers effective from 1 June, 2015 for FY 2015-16

| | Existing RInfra-D Tariff w.e.f. 1 April 2015 (FY 2015-16, as per MYT Order + FAC) | | | | | | | | Revised RInfra-D Tariff Approved by the Commission for FY 2015-16 w.e.f. 1 June 2015 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Variable Charges | | | | | | | | Variable Charges | | | | |
| Consumer Category | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Wheeling Charge (Rs/kWh) | Energy Charge (Rs/kWh) | FAC (Rs/kWh) | Regulatory Asset Charges (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs/kWh) | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Wheeling Charge (Rs/kWh) | Energy Charge (Rs/kWh) | Regulatory Asset Charges (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs/kWh) | Average Tariff Increase (%) |
| **Low Tension - LT** | | | | | | | | | | | | | | | | |
| **LT I : LT -Residential** | | | | | | | | | | | | | | | | |
| **LT I - Below Poverty Line** | 5 | | 1.27 | 0.30 | 0.33 | 0.27 | 0.90 | 2.17 | 10 | | 1.80 | 0.65 | 0.27 | 0.92 | 2.72 | |
| **LT -I Residential (Single Phase)** | | | | | | | | | | | | | | | | 5% |
| 0-100 | 40 | | 1.27 | 2.03 | 0.75 | 0.56 | 3.34 | 4.61 | 50 | | 1.80 | 2.43 | 0.56 | 2.99 | 4.79 | 5% |
| 101-300 | 75 | | 1.27 | 3.18 | 1.11 | 0.75 | 5.04 | 6.31 | 75 | | 1.80 | 3.99 | 0.75 | 4.74 | 6.54 | 3% |
| 301-500 | 75 | | 1.27 | 3.98 | 1.29 | 0.89 | 6.16 | 7.43 | 75 | | 1.80 | 5.57 | 0.89 | 6.46 | 8.26 | 11% |
| 500 and above | 100 | | 1.27 | 5.23 | 1.68 | 1.07 | 7.98 | 9.25 | 100 | | 1.80 | 7.21 | 1.07 | 8.28 | 10.08 | 9% |
| **LT - II Commercial** | | | | | | | | | | | | | | | | |
| **LT II (a) - 0-20 kW** | 250 | | 1.27 | 3.73 | 1.55 | 0.84 | 6.12 | 7.39 | 275 | | 1.80 | 5.42 | 0.84 | 6.26 | 8.05 | 9% |
| LT II (a) TOD Option | 250 | | 1.27 | 3.73 | 1.55 | 0.84 | 6.12 | 7.39 | 275 | | 1.80 | 5.42 | 0.84 | 6.26 | 8.05 | |
| **LT II (b) - 20-50 kW** | | 200 | 1.27 | 4.73 | 1.96 | 1.01 | 7.70 | 8.97 | | 220 | 1.80 | 6.33 | 1.01 | 7.34 | 9.14 | 3% |
| **LT II (c) - above 50 kW** | | 200 | 1.27 | 5.98 | 2.08 | 1.22 | 9.28 | 10.55 | | 220 | 1.80 | 7.26 | 1.22 | 8.48 | 10.27 | -2% |
| **LT III - LT Industrial upto 20 kW** | 250 | | 1.27 | 4.48 | 1.50 | 0.97 | 6.95 | 8.22 | 275 | | 1.80 | 6.08 | 0.97 | 7.05 | 8.85 | 8% |
| **LT IV - LT Industrial above 20 kW** | | 200 | 1.27 | 4.23 | 1.50 | 0.93 | 6.66 | 7.93 | | 220 | 1.80 | 6.03 | 0.93 | 6.96 | 8.76 | 11% |
| **LT-V : LT-Advertisements and Hoardings** | 400 | | 1.27 | 11.73 | 3.46 | 2.19 | 17.38 | 18.65 | 450 | | 1.80 | 14.83 | 2.19 | 17.02 | 18.82 | 2% |
| **LT VI: LT -Street Lights** | | 200 | 1.27 | 4.23 | 1.62 | 0.93 | 6.78 | 8.05 | | 220 | 1.80 | 4.19 | 0.93 | 5.12 | 6.91 | -9% |
| **LT-VII (A): LT - Temporary Supply Religious** | 200 | | 1.27 | 3.73 | 1.27 | 0.84 | 5.84 | 7.11 | 225 | | 1.80 | 4.84 | 0.84 | 5.68 | 7.48 | 5% |
| **LT-VII (B): LT - Temporary Supply Others** | 200 | | 1.27 | 12.73 | 3.44 | 2.36 | 18.53 | 19.80 | 450 | | 1.80 | 16.07 | 2.36 | 18.43 | 20.22 | 3% |
| **LT VIII: LT - Crematorium & Burial Grounds** | 200 | | 1.27 | 3.83 | 1.08 | 0.86 | 5.77 | 7.04 | 225 | | 1.80 | 4.80 | 0.86 | 5.66 | 7.45 | 6% |
| **LT IX: LT -Agriculture** | 20 | | 1.27 | 0.73 | 0.39 | 0.34 | 1.46 | 2.73 | 25 | | 1.80 | 1.01 | 0.34 | 1.35 | 3.15 | 15% |
| **LT X: LT -Public Service** | 250 | | 1.27 | 4.18 | 1.55 | 0.92 | 6.65 | 7.92 | 275 | | 1.80 | 6.37 | 0.92 | 7.29 | 9.09 | 3% |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| **HT** | | | | | | | | | | | | | | | | |
| **HT I: HT-Industry** | | 200 | 0.65 | 5.55 | 1.50 | 1.04 | 8.09 | 8.74 | | 220 | 0.94 | 7.27 | 1.04 | 8.31 | 9.25 | 7% |
| **HTII : HT- Commercial** | | 200 | 0.65 | 6.30 | 1.84 | 1.17 | 9.31 | 9.96 | | 220 | 0.94 | 8.48 | 1.17 | 9.65 | 10.59 | 7% |
| **HT III: HT-Group Housing Society** | | 200 | 0.65 | 5.15 | 1.34 | 0.98 | 7.47 | 8.12 | | 220 | 0.94 | 6.40 | 0.98 | 7.38 | 8.32 | 3% |
| **HTIV : HT - Temporary Supply** | 200 | | 0.65 | 8.35 | 2.35 | 1.52 | 12.22 | 12.87 | 450 | | 0.94 | 10.61 | 1.52 | 12.13 | 13.07 | 2% |
| **HT V - Railway** | | | | | | | | | | | | | | | | |
| a) 22 kV/33 kV | | 200 | 0.65 | 5.35 | 1.66 | 1.01 | 8.02 | 8.67 | | 220 | 0.94 | 7.37 | 1.01 | 8.38 | 9.32 | 8% |
| b) 100 kV | | | | | | | | | | | | | | | | |
| **HT VI - Public Service** | | 200 | 0.65 | 5.35 | 1.66 | 1.01 | 8.02 | 8.67 | | 220 | 0.94 | 6.36 | 1.01 | 7.37 | 8.31 | -8% |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

## Annexure 2: Category-wise Tariff for TPC-D's consumers effective from 1 June, 2015 for FY 2015-16

| Consumer Category | Existing TPC-D Tariff w.e.f 1 April, 2015 (FY 2015-16, as per MYT Order + zero FAC) | | | | | Revised TPC-D Tariff Approved by the Commission for FY 2015-16, w.e.f. 1 June, 2015 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | Variable Charges | | | | | |
| | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Wheeling Charge (Rs/kWh) | Energy Charge (Rs/kWh) | Total Variable Charges incl. Whlg Chgs (Rs/kWh) | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Wheeling Charge (Rs/kWh) | Energy Charge (Rs/kWh) | Regulatory Asset Charges (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs/kWh) | Total Variable Charges incl Whlg Chg (Rs/kWh) | Average Tariff Increase (%) |
| Low Tension - LT | | | | | | | | | | | | | |
| LT I: LT-Residential | | | | | | | | | | | | | |
| LT I - Below Poverty Line | 3 | | 1.81 | 0.47 | 2.28 | 10 | | 0.77 | 0.60 | 0.03 | 0.63 | 1.41 | |
| LT -I Residential (Single Phase) | | | | | | | | | | | | | -1% |
| 0-100 | 40 | | 1.81 | 0.81 | 2.62 | 50 | | 0.77 | 1.21 | 0.07 | 1.28 | 2.05 | -17% |
| 101-300 | 75 | | 1.81 | 2.75 | 4.56 | 75 | | 0.77 | 3.25 | 0.19 | 3.44 | 4.21 | -7% |
| 301-500 | 75 | | 1.81 | 6.38 | 8.19 | 75 | | 0.77 | 7.23 | 0.42 | 7.65 | 8.42 | 3% |
| 500 and above | 100 | | 1.81 | 8.46 | 10.27 | 100 | | 0.77 | 9.31 | 0.54 | 9.85 | 10.63 | 3% |
| LT - II Commercial | | | | | | | | | | | | | -3% |
| LT II (a) - 0-20 kW | 250 | | 1.81 | 6.50 | 8.31 | 275 | | 0.77 | 7.50 | 0.43 | 7.93 | 8.70 | 5% |
| LT II (a) TOD Option | | | | | | | | | | | | | |
| LT II (b) - 20-50 kW | | 200 | 1.81 | 6.81 | 8.62 | | 220 | 0.77 | 6.01 | 0.35 | 6.36 | 7.13 | -12% |
| LT II (c) - above 50 kW | | 200 | 1.81 | 7.46 | 9.27 | | 220 | 0.77 | 7.62 | 0.44 | 8.06 | 8.84 | -3% |
| LT III - LT Industrial upto 20 kW | 250 | | 1.81 | 5.80 | 7.61 | 275 | | 0.77 | 6.90 | 0.40 | 7.30 | 8.07 | 6% |
| LT IV - LT Industrial above 20 kW | | 200 | 1.81 | 6.75 | 8.56 | | 220 | 0.77 | 7.35 | 0.42 | 7.77 | 8.55 | 1% |
| LT-V : LT-Advertisements and Hoardings | 400 | | 1.81 | 17.26 | 19.07 | 450 | | 0.77 | 14.26 | 0.82 | 15.08 | 15.85 | -15% |
| LT VI: LT -Street Lights | | 200 | 1.81 | 5.05 | 6.86 | | 220 | 0.77 | 5.55 | 0.32 | 5.87 | 6.65 | |
| LT-VII (A): LT - Temporary Supply Religious | 200 | | 1.81 | 3.15 | 4.96 | 225 | | 0.77 | 3.85 | 0.22 | 4.07 | 4.85 | -2% |
| LT-VII (B): LT - Temporary Supply Others | 400 | | 1.81 | 14.10 | 15.91 | 450 | | 0.77 | 13.10 | 0.76 | 13.86 | 14.64 | -8% |
| LT VIII: LT - Crematorium & Burial Grounds | 200 | | 1.81 | 2.90 | 4.71 | 225 | | 0.77 | 3.40 | 0.20 | 3.60 | 4.37 | |
| LT IX: LT -Agriculture | | | | | | | | | | | | | |
| LT X: LT -Public Service | 250 | | 1.81 | 6.33 | 8.14 | 275 | | 0.77 | 7.53 | 0.43 | 7.96 | 8.74 | 7% |
| | | | | | | | | | | | | | |
| HT | | | | | | | | | | | | | |
| HT I: HT-Industry | | 200 | 0.92 | 7.90 | 8.82 | | 220 | 0.36 | 8.44 | 0.49 | 8.93 | 9.29 | 6% |
| HTII : HT- Commercial | | 200 | 0.92 | 8.24 | 9.16 | | 220 | 0.36 | 8.11 | 0.47 | 8.58 | 8.94 | -1% |
| HT III: HT-Group Housing Society | | 200 | 0.92 | 12.05 | 12.97 | | 220 | 0.36 | 9.05 | 0.52 | 9.57 | 9.93 | |
| HTIV : HT - Temporary Supply | 200 | | 0.92 | 12.80 | 13.72 | 450 | | 0.36 | 11.80 | 0.68 | 12.48 | 12.84 | -6% |
| HT V - Railway | | | | | | | | | | | | | 0% |
| a) 22 kV/33 kV | | 200 | 0.92 | 7.76 | 8.68 | | 220 | 0.36 | 7.74 | 0.45 | 8.19 | 8.55 | 0% |
| b) 100 kV | | 200 | 0.92 | 7.63 | 8.55 | | 220 | 0.36 | 7.63 | 0.44 | 8.07 | 8.43 | 0% |
| HT VI - Public Service | | 200 | 0.92 | 8.16 | 9.08 | | 220 | 0.36 | 8.38 | 0.48 | 8.86 | 9.22 | 1% |